(९)

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

४ था मजला, एक्सप्रेस टॉवर्स, नरीमन पॉईंट, मुंबई-४०० ०२१
दूरध्वनी क्र. : २२०२६२४९, २२८३५२४७ फॅक्स : २२०२९३४८
ई.मेल पत्ता: mstmjp@rediffmail.com
caomjp@rediffmail.com
वेब पत्ता : mahajeevan.com

जा.क्र. मजीप्रा/सस/आ-४/ दिनांक : २२ जानेवारी, २००८

**विषयः** दिनांक १५ जानेवारी, २००८ रोजी संपन्न झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०९ व्या बैठकीचे इतिवृत्त..

दिनांक १५ जानेवारी, २००८ रोजी दुपारी ३.३० वाजता महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १०९ वी सभा संपन्न झाली. सदर सभेचे इतिवृत्त मान्यतेसाठी यासोबत सादर करण्यात येत आहे. कृपया सदर इतिवृत्तास मान्यता मिळावी, ही विनंती.

**सोबत : इतिवृत्त.**

संजय दहासहस्र
**( संजय दहासहस्र )**
**सदस्य सचिव**

**मा. मंत्री,**
**पा.पु. व स्व.**
**तथा अध्यक्ष, म.जी.प्रा. :**

TS-1/44

संजय दहासहस्र
22-1-08

मु.प्र/अ.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०९ व्या सभेचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १०९ वी सभा मा.मंत्री, जलसंपदा, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष, मा. श्री. अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दिनांक १५ जानेवारी २००८ रोजी संपन्न झाली या सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील सदस्य उपस्थित होते.

१) मा.श्री. अजित पवार, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२) श्री. अजित कुमार जैन, प्रधान सचिव, पा.पु.व स्व.विभाग
३) प्रधान सचिव, (वित्त व सुधारणा) वित्त विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य यांचे वतीने श्री.शि.म.म्हात्रे, उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.३२
४) प्रधान सचिव (उर्जा) उद्योग उर्जा कामगार विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य यांच्या वतीने श्री.प्र.ना.मुदखेडकर, उप सचिव (उर्जा) उर्जा विभाग, मंत्रालय, मुंबई.३२
५) श्री. संजय दहासहस्त्र, सदस्य सचिव , म.जी.प्रा. मुंबई

या व्यतिरिक्त सदर सभेस खालील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे अधिकारी तसेच इतर विभागाचे पदाधिकारी उपस्थित होते.

१) श्रीमती जयलक्ष्मी चेक्कला, सह सचिव, पापुवस्ववि, मंत्रालय, मुंबई
२) श्री. राजेंद्र होलानी, मुख्य अभियंता, म.जी.प्रा.पुणे
३) श्री. हेमंत लांडगे, मुख्य अभियंता, म.जी.प्रा. नागपूर
४) श्री. व्ही.आर.कल्याणकर, मुख्य अभियंता तथा विशेष कार्य अधिकारी पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
५) श्री. प्र. वा. पांढरीपांडे, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा. नवी मुंबई
६) श्री. द. चि. सुर्यवंशी ,अधीक्षक अभियंता (मुख्यालय) म.जी.प्रा. मुंबई
७) श्री. बा. शि. पाटील, उप मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा. नवी मुंबई
८) श्री. सु. पु. भातखंडे, मुख्य प्रशासकीय अधिकारी म.जी.प्रा., मुंबई.

मा.मंत्री, जलसंपदा, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरुवात झाली .

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. १: महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०८ व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे बाबत.**

दिनांक ८ व १३ ऑगस्ट २००७ रेजी संपन्न झालेल्या १०८ व्या सभेच्या इतिवृत्तास सर्वसाधारण चर्चेनंतर मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.२ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १०८ व्या सभेतील निर्णयावर करण्यात आलेली कृती.**

दिनांक ८ व १३ ऑगस्ट २००७ रोजी संपन्न झालेल्या १०८ व्या सभेच्या इतिवृत्तास सर्वसाधारण चर्चेनंतर मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.३ : राज्य सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरता शिल्लक निधी गुंतविण्यासाठी सुधारीत मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या गुंतवणुकीस मान्यता मिळण्याबाबत.**

सदर कार्यक्रम बाबीवरील सर्व मुद्यांबाबत वि.स. व मु.ले.अ. यांनी सविस्तर उहापोह केला असता मा. अध्यक्ष यांनी शासन निर्णयातील तरतूदीनुसार गुंतवणूक केली आहे किंवा नाही याची विचारणा केली. त्यास सदस्य सचिव यांनी शासन निर्णयानुसारच कार्यवाही केली जाते असे सूचित केल्याने खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, दि. ०२.८.२००७ ते ३१.१२.२००७ या कालावधीत प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे केलेल्या अल्प व दिर्घ मुदतीच्या गुंतवणुकीस मान्यता देण्यांत येत आहे, तसेच दिर्घ मुदतीच्या मुदतपूर्व काढुन घेण्यात आलेल्या गुंतवणुकीसही मान्यता देण्यात येत आहे.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. ४ : राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना / सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांना ६% महागाई भत्ता वाढ मंजूर करण्याबाबत.**

---

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांना शासकीय कर्मचाऱ्याप्रमाणे दिनांक १/७/२००७ पासुन ६% महागाई भत्ता लागू करण्याबाबतचा प्रस्ताव मा. सदस्य सचिव यांनी संचालक मंडळासमोर विदीत केला. सदर बाबीवर सांगोपांग चर्चा झाल्यानंतर खालील ठरावास मान्यता देण्यात आली.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाकडील शासन निर्णय दिनांक २४.९.२००७ अन्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना ६% महागाई भत्ता मंजुर करण्यात आलेला आहे. त्याच धर्तीवर महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना व सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांना दिनांक २४.९.२००७ च्या शासन निर्णयातील तरतुदी लागू करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र. ५:** स्थापत्य व विद्युत बेरोजगार अभियंत्यांच्या कंत्राटदार नोंदणीचे नुतनीकरणाबाबत..

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दि.११.२.२००४ च्या शासन निर्णयाव्दारे प्रसृत करण्यात आलेल्या बेरोजगार अभियंत्यांच्या नोंदणी नुतनीकरणाबाबतचे निकष / निर्देश महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील संबंधितांच्या नोंदणीसाठी जसेच्या तसे लागू करणे तसेच दि.८.०२.२००७ च्या शासन निर्णयानुसार बेरोजगार अभियंत्यांच्या नोंदणीबाबत सुधारित निकषानुसार उपरोक्त वर्ग ५-अ या नव्या कंत्राटदार वर्गवारीची निर्मिती करुन त्याअंतर्गत फक्त बेरोजगार अभियंत्यांची प्रथम नोंदणी रु.३० लक्ष आर्थिक मर्यादेच्या कामांसाठी करण्याबाबतची कार्यक्रम बाब संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत असल्याचे सदस्य सचिव यांनी नमूद केले.

तथापि, मजीप्रा एवढया छोटया किमतीची कामे राबवित नसल्याने अशा नोंदणीकरणाचा मजीप्रास उपयुक्त नसल्याने सद्यःस्थितीत यावर विचार करणे आवश्यक नसल्याचे चर्चेअंती ठरले. त्यामुळे सदर बाब तूर्त अमान्य करण्यात आली. तसेच याबाबत मजीप्रामध्ये सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांच्या कामकाजाबाबत काय अनुभव येत आहे याबाबतची माहिती क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडून त्यांच्या अभिप्रायासह मागविण्याचे ठरले.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**कार्यक्रम बाब क्र. ६: महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सन २००६-०७ वार्षिक लेखे स्विकृत होणेबाबत.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सन २००६-०७ च्या वार्षिक लेख्यास मान्यता मिळण्याबाबतची सदरची कार्यक्रम सादर करण्यात आली. सदर बाबीबाबत वि.स. व मु.ले.अ. यांनी संचालक मंडळास अवगत केले. अंतिमतः सादर केलेल्या कार्यक्रम बाबीस मान्यता प्रदान करण्यात येऊन पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**आयत्यावेळची कार्यक्रम बाब क्र.१ : महाराष्ट्र जीवन प्राधिकरण वैद्यकीय विनियम १९८० (वैद्यकीय लाभ ) मध्ये सुधारणा करणेबाबत.**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या वैद्यकीय विनियम १९८० (वैद्यकीय लाभ) मधील नियम २(३) व नियम-३ मधील तरतुदींच्या अधिन राहुन खाजगी रुग्णालयात जर प्राधिकरणाच्या अधिकारी कर्मचाऱ्याने आकस्मिक कारणासाठी अंतररुग्ण म्हणुन उपचार घेतले तर त्यावरील खर्चाची प्रतिपूर्ती रु. २०,००० च्या कमाल मर्यादेच्या अधिन राहुन सदस्य सचिव यांच्या मंजूरी नंतर अदा केले जाते हा प्रघात आजतागायत चालू आहे. सदस्य सचिव यांच्या कार्यव्यस्थेमुळे अशी प्रकरणे मध्यवर्ती कार्यालयाकडे मंजूरीसाठी न पाठवता क्षेत्रिय स्तरावरच वैद्यकीय देयके निकाली काढली जावीत ही बाब संचालक मंडळाच्या निदर्शनास आणून देण्यात आले. यावर सांगोपांग चर्चा करुन खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

ठराव :

खाजगी रुग्णालयात अंतररुग्ण म्हणुन घेतलेल्या उपचारावरील खर्चाची प्रतिपूर्ती रु.२०,००० च्या मर्यादेत राहुन (जिल्हा शल्य चिकित्सक यांचे आजाराचे गटवारीच्या अधिन राहुन) मंजूर करण्याचे अधिकार खालील प्रमाणे देण्यात येत आहेत.

**क्षेत्रिय कार्यालय स्तरावर :**

१) कार्यकारी अभियंता : रु. ५०००/- पर्यंत
२) अधिक्षक अभियता : रु. ५००१/- ते रु. १००००/- कमाल मर्यादेपर्यंत
३) मुख्य अभियंता : रु. १०००१/- ते रु. २००००/-

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**मध्यवर्ती कार्यालय स्तर वर :**

खाजगी रुग्णालयातील प्रतिपूर्तीचे (रु.२००००/- च्या कमाल मर्यादेचे अधिकार)

मुख्य प्रशासकीय अधिकारी : रु . २००००/- पर्यंत

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण वैद्यकीय नियम नियम १(४) अन्वये उपचार घेतल्यापासुन तीन महिन्याच्या आत प्रतिपूर्तीचे देयक सादर करणे आवश्यक ठरविण्यात आले आहे. तथापि महाराष्ट्र जीवन प्राधिकरण वैद्यकीय नियम १(४) अन्वये विशिष्ट प्रकरणात समाधानकारक खुलासा ग्राहय वाटल्यास हा विलंब क्षमापित करण्याचे अधिकार सदस्य सचिव यांना आहेत. हे अधिकार क्षेत्रिय स्तरावर खालील प्रमाणे देण्यात येत आहेत.

१) क्षेत्रीय स्तरावर विलंब क्षमापित करण्याचे अधिकार मुख्य अभियंता यांना उक्त नियमातील अटी व शर्तींच्या अधिन राहुन मंजूर करण्याचे अधिकार देण्यात येत आहे.

२) मध्यवर्ती कार्यालयील विलंब क्षमापित करण्याचे अधिकार मुख्य प्रशासकीय अधिकाऱ्यांना नियमातील अटी व शर्तींच्या अधिन राहुन मंजूर करण्याचे अधिकार देण्यात येत आहे.

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र. २:** पिपरी (मेघे) प्रादेशिक पाणी पुरवठा योजना (९ गावे) तालुका व जिल्हा वर्धा, या योजनेच्या सुधारीत आकृतीबंधास मान्यता मिळणेबाबत.

मजीप्राची योजना म्हणून प्रशासकीय मान्यताप्राप्त प्रगतीपथावर असलेल्या पिपरी (मेघे) व ९ गावांचे प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेत वायगाव (निपाणी) या गावाचा समावेश केला असून बांधकाम साहित्याच्या दरात झालेली वाढ, वीज, रेल्वे व रोड क्रॉसींग व त्याचप्रमाणे स्वयंचलित प्रणालीचा अंतर्भाव इत्यादीमुळे योजनेच्या किमतीत वाढ झाल्याने रु.४०८१.५० लक्ष किमतीचा प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर केला आहे.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

सदर प्रस्तावात, मान्यताप्राप्त आर्थिक आकृतीबंधानुसार ४० व ७० लिटर्स या फरकापोटी येणारी रक्कम मजीप्राने उभारावयाची होती. तथापि, ७३ व ७४ व्या घटना दुरूस्तीनुसार योजना राबवून दैनंदिन देखभाल दुरूस्ती करणे संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेची जबाबदारी असूनही सदर योजना लोकहितार्थ राबवित आहे. ही बाब विचारात घेऊन सदर फरकापोटीची रक्कम शासनाने विशेष बाब म्हणून मंजूर करण्यास प्रस्तावित केली असून सदरची योजना ९०% शासकीय अनुदान व १०% लोकवर्गणी अशा वित्तीय आकृतीबंधाने सादर केली आहे. शासनास सादर केलेल्या या प्रस्तावावर शासनाने यास मजीप्राच्या संचालक मंडळाची मान्यता घेण्याचे दिनांक १५ नोव्हेंबर, २००७ च्या पत्रानुसार कळविले आहे. या अनुषंगाने सदरची कार्यक्रम बाब संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत असल्याचे सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

सदर प्रस्तावावर चर्चा होऊन वायगाव (निपाणी) या गावाचा समावेश, प्रस्तावित आकृतीबंध ९०% शासकीय अनुदान व १०% लोकवर्गणी विचारात घेऊन सादर केलेल्या रु.४०८१.५० लक्ष किमतीच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली व याअनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र. ३:** सांगली मिरज कुपवाड महापालिकेचे UIDSSMT कार्यक्रमांतर्गत मंजूर झालेले प्रकल्प ५% ई. ॲन्ड पी. दराने मजीप्रामार्फत पूर्ण ठेव तत्वावर करणेबाबत..

केंद्र शासन पुरस्कृत UIDSSMT कार्यक्रमांतर्गत मंजूर झालेले रु. २१०.३४ कोटी किमतीचे एकूण ४ प्रकल्प (२ पाणी पुरवठा व २ भुयारी गटार योजना) मजीप्रामार्फत ५% ई. ॲन्ड पी. दराने पूर्ण ठेव तत्वावर करण्यास संचालक मंडळाची मान्यता घेण्यासाठीची कार्यक्रम बाब सादर करण्यात येत असल्याचे विषद केले.

सदर प्रस्तावाबाबत सदस्य सचिव तसेच मुख्य अभियंता, मजीप्रा, पुणे यांनी संचालक मंडळास सविस्तरपणे अवगत केले. सदर प्रस्तावावर चर्चा होऊन चारही प्रकल्प ५% ई. ॲन्ड पी. दराने करण्यास एक खासबाब म्हणून मान्यता देण्यात आली. मात्र, प्रकल्प पूर्णत्वासाठी लागणारा निधी व केंद्र शासनाकडून प्राप्त होणारा निधी यातील फरकाची रक्कम सांगली मिरज कुपवाड महापालिकेने द्यावी या अटीच्या अधीन राहून संचालक मंडळाने मान्यता दिली. त्याचप्रमाणे सदरची कामे कमीतकमी कालावधीत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

मा. अध्यक्ष तथा<br>मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव<br>म.जी.प्रा.

(८)

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र. ४:** सुधारित सातारा नळ पाणी पुरवठा योजना तालुका व जिल्हा सातारा (लहान व मध्यम शहरांसाठी पायाभूत सुविधांच्या विकास योजनेअंतर्गत) (UIDSSMT) ग्रामीण / नागरी नळ पाणी पुरवठा योजनेचे व्यवस्थापन देखभाल व दुरुस्ती मजीप्राने कंत्राटी पध्दतीने करण्या बाबत.

सातारा शहरास कास धरण व उरमोडी नदीवरील उद्‌भव असलेल्या योजना सातारा नगरपरिषदेच्या मालकीच्या आहेत व कृष्णा नदीवरुन कार्यान्वित असलेली योजना मजीप्रामार्फत नगरपरिषदेच्या काही भागात ठोक पध्दतीने, काही भागात थेट ग्राहकांपर्यंत, त्याचप्रमाणे नगरपालिकेच्या हद्दीबाहेर ग्रामपंचायतीच्या क्षेत्रात थेट ग्राहकांपर्यंत पाणी पुरवठा करण्यात येतो.

सदर शहराच्या वाढत्या लोकसंख्येची गरज विचारात घेऊन मजीप्रा व नगरपरिषदेने संयुक्तरित्या रु. ४७१५.९८ लक्ष किमतीची योजना केंद्र शासनाच्या UIDSSMT कार्यक्रमांतर्गत सादर केली आहे. यामध्ये मजीप्राचा भाग म्हणून रु. २२२८.४३ लक्ष व सातारा नगरपालिकेचा भाग म्हणून रु.२४८७.५५ लक्ष इतकी किंमत आहे. मजीप्राचा भाग म्हणून सादर केलेली कृष्णा उद्‌भवावरील योजना पूर्वीप्रमाणेच मजीप्राने १०% लोकवर्गणी भरुन हाती घेणे व पूर्वीप्रमाणे देखभाल दुरूस्ती मजीप्राने करणे अशी कार्यक्रम बाब संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत असल्याचे सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. सदर योजनेबाबत सविस्तर विवेचन मुख्य अभियंता, पुणे यांनी केले. सदर प्रस्तावावर चर्चा होऊन सादर केलेल्या याबाबीस सदर योजना मजीप्राच्या मालकीची राहील या अटीस अधीन राहून संचालक मंडळाने मान्यता दिली. या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत केले.

**आयत्यावेळची कार्यक्रम बाब क्र. ५: वाढीव देवळाली प्रवारा पाणी पुरवठा योजना , ता. राहुरी जिल्हा अहमदनगर योजनेस खुल्या बाजारातील कर्ज वर्ग करुन देणे बाबत.**

म.जी.प्रा.ने वरील योजनेस खुल्या बाजारातून कर्ज उपलब्ध करुन घेऊन वर्ग करण्याबाबतची सदरची कार्यक्रम बाब सादर करण्यात आली. सदर बाबीबाबत वि.स. व मु.ले.अ. यांनी संचालक मंडळास अवगत केले. अंतिमतः सादर केलेल्या कार्यक्रम बाबीवर संचालक मंडळाने तत्वतः मान्यता दिल्याने खालीलप्रमाणे ठराव परित करण्यात आला.

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.

**ठराव :**

इचलकरंजी पाणी पुरवठा योजना, टप्पा क्र. ५ व ६, भाग-१ (कृष्णा नदी उद्‌भव) अंदाजित किंमत रु. ११०३ लक्ष योजनेवरील शिल्लक राहीलेले रु. २३८.९९ लक्ष खुल्या बाजारातील कर्जापैकी रु.२१७ लक्ष देवळाली प्रवरा नगरपालिकेस प्रस्तावातील अटी व शर्तीनुसार खुल्या बाजारातील कर्जाच्या वाटपाचा करारनामा करण्यास वि.स. व मु.ले.अ. व सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र. ६: तिरोडा वाढीव पाणी पुरवठा योजनेकरीता रु. ३२.७१ लक्ष कर्जाची रक्कम मजीप्राने स्वतःच्या उत्पन्नातून अदा करुन सदर योजनेची मालकी मजीप्राकडे ठेवण्याबाबत.**

तिरोडा शहराकरीता सन १९८५ पासून राबविण्यात येत असलेल्या पाणी पुरवठा योजनेचा मालकी हक्क महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे असून दैनंदिन देखभाल व दुरुस्तीचे तसेच वसुलीचे व्यवस्थापनही महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडे आहे. अस्तित्वातील योजनेत जलशुध्दीकरण केंद्र नसल्यामुळे व नगरपरिषदेच्या सततच्या मागणीमुळे रु. ८१.८७ लक्ष किंमतीच्या जलशुध्दीकरण केंद्राला महाराष्ट्र शासनाने ३० मार्च, २००५ ला मंजूरी दिलेली असून या योजनेची कामे पूर्ण झाली आहेत. मात्र या योजनेची मालकी नगरपरिषदेची आहे.

या योजनेतील मंजूर आकृतीबंधानुसार नगरपरिषदे मार्फत उभारावयाचे रु. ३२.६७ लक्ष कर्जाची रक्कम नगरपरिषदेने उपलब्ध करुन न दिल्याने ठेकेदारांची देयकेही अदा करता येत नाहीत. त्यामुळे पूर्वीची योजना मजीप्राकडे व नवीन योजना नगरपरिषदेकडे ही बाब संयुक्त राहणार नाही, त्याचप्रमाणे नगरपरिषदेने उपलब्ध करावयाच्या कर्जापोटीची रक्कम रु. ३२.६७ लक्षच्या अनुपलब्धतेचा विचार करता सदर योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने रु. ३२.६७ लक्ष इतकी रक्कम स्वतःच्या उत्पनातून अदा करुन मजीप्राची म्हणून राबविण्यास संचालक मंडळाची मान्यता घेण्याची कार्यक्रम बाब सादर करण्यात येत असल्याचे सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले.

सदर प्रस्तावावर चर्चा होऊन रु.३२.६७ लक्ष इतका विशेष निधी मजीप्राने देण्यासाठी व योजना मजीप्राची म्हणून राबविण्यासाठी सादर केलेल्या कार्यक्रम बाबीस संचालक मंडळाने मान्यता दिली व पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत केले.

बैठकीसमोर अन्य विषय नसल्याने उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर करण्यात आले.

B.M.-109/Min./8

मा. अध्यक्ष तथा
मंत्री, पा.पु. व स्व.

सदस्य सचिव
म.जी.प्रा.